प्रती,
संपादक/वृत्तसंपादक
कृपया प्रसिध्दीकरिता सादर.

(हनुमंत गोफणे)
जनता संपर्क अधिकारी
बेस्ट उपक्रम
दूरध्वनी क्र.२२७९९३९५


PRESS NOTE
THE BRIHAN MUMBAI ELECTRIC SUPPLY & TRANSPORT UNDERTAKING
(Of The Brihan Mumbai Mahanagar Palika)
BEST Bhavan, Post Box No. 192,
Mumbai - 400 001.

बेस्ट
प्रसिद्धी पत्रक
बृहन्मुंबई विद्युत पुरवठा आणि परिवहन उपक्रम
(बृहन्मुंबई महानगरपालिका अंतर्गत)
बेस्ट भवन, पत्र पेटी क्र.१९२,
मुंबई - ४०० ००१.


प्रसिध्दी पत्रक क्र.७
दिनांक : १८.०७.२०१९

# विद्युत शुल्क सुट व परतावा

मुंबई, १८- महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक इएलडी-२०१३/प्र.क्र.७९/भाग १/ऊर्जा -१ दिनांक २१ जुन २०१९ अन्वये बेस्ट उपक्रमाचे जे वीज ग्राहक विद्युत शुल्क सुट परताव्यास पात्र आहेत व उद्योग संचानालयाकडून दि. ३१ डिसेंबर, २०१५ पूर्वीच्या प्रकरण, दि. ३१ मार्च, २०१९ पर्यंत देण्यात आलेल्या पात्रता प्रमाणपत्राच्या प्रकरणी दि. ३० सप्टेंबर, २०१९ पर्यंत संबंधित ग्राहकांकडून अर्ज घेण्यास वीज कंपन्यांना मुभा देण्यात आली आहे.

तसेच दि. ३१ मार्च, २०१९ नंतर पात्रता प्रमाणपत्र प्राप्त झाले असल्यास त्यास पात्रता प्रमाणपत्र् मिळाल्यापासून ६ महिन्याच्या आत ग्राहाकांनी वीज वीतरण कंपन्यांकडे सादर करण्यात यावीत असे निर्देशित करण्यात आले आहे. दि. ३१ डिसेंबर, २०१५ नंतरच्या ग्राहकांकडून प्राप्त अर्जाच्या प्रकरणी, उद्योग घटकास दि. ३१ मार्च, २०१९ पर्यंत पात्रता प्रमापणपत्र मिळाले असल्यास त्यास दि.३० सप्टेंबर, २०१९ पर्यंत अर्ज करावयाची मुभा देण्यात आली आहे. तसेच दि. ३१ मार्च, २०१९ नंतर प्राप्त झालेल्या प्रमाणपत्रा बाबत, असे प्रमाणपत्र मिळाल्यापासून ६ महिन्याच्या आत अर्ज स्विकारण्यास वीज वितरण कंपन्यांस मुभा देण्यात आली आहे.

उपरोक्त महाराष्ट्र शासन निर्णय क्रमांक इएलडी-२०१३/प्र.क्र.७९/भाग १/ऊर्जा -१ दिनांक २१ जुन २०१९ अन्वये बेस्ट उपक्रमाचे वीज ग्राहक सदर विद्युत शुल्क सुट परताव्यास पात्र आहेत. अशा ग्राहकांनी आपले अर्ज बेस्ट उपक्रमाच्या संबंधीत ग्राहक सेवा विभागात दिनांक ३० सप्टेंबर २०१९ पूर्वी सादर करावेत. त्यानंतर आलेल्या वीज शुल्क सुट परतावा अर्जाचा विचार करण्यात येणार नाही.

.........